# योद्धा रोमित चव्हाण

## एक संघर्ष कथा



सूरज गाताडे

# योद्धा रोमित चव्हाण

## एक संघर्ष कथा

(कादंबरी)

## सूरज काशिनाथ गाताडे

ई साहित्य प्रतिष्ठान

# योद्धा रोमित चव्हाण- एक संघर्ष कथा


## सूरज काशिनाथ गाताडे

स्क्रिनरायटर्स असोसिएशन मेम्बरशीप नंबर - २१८३१

रा. पेठवडगांव, ता. हातकणंगले, जिल्हा - कोल्हापूर, महाराष्ट्र - ४१६११२

ई-मेल आयडी - surajgatade26@gmail.com

मोबाईल व व्हॉट्सॲप - 9890137797

फेसबुक - http://www.facebook.com/suraj.gatade.140

इन्स्टाग्राम - http://www.instagram.com/surajgatade26



या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक: ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com
**e**sahity@gmail.com
Whatsapp- 9987737237
फोन- 77570 31933
(विनामूल्य पुस्तके मिळण्यासाठी आपले नाव व गाव कळवा)

प्रकाशन: ३ डिसेंबर २०२४ (बांगला देश युद्ध आरंभ दिन)

©esahity Pratishthan®2024

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

**हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.**



प्रस्तावना : -

नमस्कार, मी सूरज काशिनाथ गाताडे. 'गर्भगृह' नंतर एक लघुकादंबरी घेऊन आलो आहे. खरे तर हा एका मोठ्या कादंबरीचा विषय. पण अभ्यास करून, माहिती घेऊन लिहिण्याचा सध्या माझ्याकडे वेळ नाही. म्हणून ही छोटी कथा घेऊन आलो आहे. सत्यघटनेवर आधारित ही काल्पनिक आहे.

यंदाच्या गणेशोत्सवात माझे काही मित्र त्यांच्यासाठी नाटक लिहिण्यासाठी मला गळ घालू लागले. त्यांना नाही म्हणू शकलो नाही. म्हणून रोमित चव्हाण या २०२२ ला शहिद झालेल्या अवघ्या २२ वर्षांच्या वीराच्या जीवनावर हे छोटे नाटक लिहिले, त्याचेच हे कथा स्वरूप. म्हणून ही कथाही लहानच.

'गर्भगृह' मध्ये शेवटी मी पुढे काही तरी मनोरंजन पर घेऊन येईन म्हणालो होतो. पण यातही काही विचार आहेच... वाचकांनी त्यासाठी क्षमा करावी... मनोरंजनापेक्षा हृदय पिळवटणारी ही घटना आहे असे मी म्हणेन.

असो, तर रोमित बद्दल माहिती घेत असताना असे समजले, की उत्तर प्रदेशचा संतोष यादव हा २८ वर्षीय जवान देखील त्याच्या सोबत विरगतीस प्राप्त झाला. तोही माहीत व्हावा म्हणून त्यालाही या घटनेत जागा दिली आहे. ती त्याच्या थोर

बलिदानापुढे न्याय्य नाही, पण किमान त्याचा उल्लेख व्हावा व तोही लोकांना समजावा म्हणून तो कथेत एका प्रसंगात आला आहे.

शहीद रोमितवर नाटक करावे अशी माझ्या मित्रांचीच कल्पना. तसा एक प्रयोग मागील वर्षी बागणी या गांवच्या एका गणेश मंडळाने केला होता, पण तो तितका प्रभावी नव्हता असे या मित्रांचे म्हणणे म्हणून त्यांना रोमितवर नाटक करायचे होते, ज्यायोगे रोमितकडून देशसेवेची नवीन पिढीला काही प्रेरणा मिळेल, देश भावना त्यांच्यात जागृत होऊन तेही कदाचित सैन्यात भरती व्हावेत अशी यांची मनीषा. मागील वर्षी यांनी कसबा बावडा येथील कारगिल युद्धात शहीद झालेले शहीद दिगंबर उलपे या एका जवानांवर नाटक केले होते व त्यातून प्रेरणा घेऊन त्यांच्याच मंडळातील एकजण सैन्यात भरतीही झाला आहे. त्यामुळे यांनाही ही प्रेरणा मिळाली, की यावेळी देखील आपल्या जवळील आणखी एका शहिदावर नाटक करू. आणि शेजारील गावातला शहीद रोमित चव्हाण त्यांच्या विचारात पुढे आला.

पण त्यांनाही संतोषबद्दल माहिती नव्हतं. किंबहुना आमच्या पंचक्रोशीत रोमित माहीत होता, पण संतोष नाही. म्हणून तोही कळावा म्हणून तो अगदी अंती का होईना आला आहे.

जेव्हा शहीद रोमित चव्हाणची माहिती घेत होतो, त्यांच्या घरी जाणे झाले.

तेव्हा गांवच्या राजकारणातील काही गोष्टी समजल्या... त्याने मन हेलावून गेले. रोमितच्या घरासमोर अगदी मुख्य रस्त्याला लागून शहीद रोमितच्या मृतिप्रीत्यर्थ एक स्मारक बांधणे चालू होते, पण ते अर्धवटच राहिले होते. म्हणजे फक्त तटबंदी भिंत. मला खूप नंतर कळले, की हे शहीद रोमित चव्हाणचे स्मारक

स्थळ आहे. जो मित्र मला तिथं घेऊन गेला होता त्याने शिगांवहून पेठ वडगांवला परतताना मला सांगितले, की गांवातील स्वतःला उच्च वर्णीय समजणाऱ्यांनी ते स्मारक होऊ दिले नाही. का? तर रोमित चव्हाण हा निम्न जातीतील आहे. आणि हे करणारे कोणी ब्राह्मण नव्हते हे मी स्पष्ट करू इच्छितो. नाही तर गैरसमज व्हावयाचा.

हा विभत्स व घृणास्पद प्रकार ऐकून राग आलाच, वाईटही वाटलं. लोक सैनिकांना देखील जातीतून दूर ठेवत नाहीत. देशांतील जात वास्तव अजून संपलेलं नाही हे प्रकर्षाने जाणवत असतेच, पण त्याचे हे जिवंत उदाहरण पुन्हा भडकपणे समोर आले.

सीमेवर लढणार कोणीही सैनिक फक्त त्याच्या जात-बांधवांसाठी तिथे उभा नसतो. त्याच्या डोक्यात एकत्रित भारताचे चित्र असते आणि त्या एकसंध भारताच्या सीमा मजबूत करण्यासाठी आणि त्या एकत्रित भारतातील विविधतेने नटलेल्या व तरीही एकरूप अशा जनतेच्या संरक्षणासाठी ते जवान तिथे असतात, मग ते कोणत्याही जाती-धर्मातील असोत. हे आपण ध्यानी ठेवलं पाहिजे... किमान यांना तरी यातून दूर ठेवा रे...

पण असो, ही छोटीशी कथा वाचकांना आवडेल अशी आशा आहे. प्रतिक्रियेच्या प्रतीक्षेत...!!!

**“आम्ही भारताचे लोक” यांना समर्पित...**

**“THE DUTY OF A TRUE PATRIOT IS TO PROTECT HIS COUNTRY FROM ITS GOVERNEMNT!”**

**-Thomas Paine**

**“SPEAK THE TRUTH, EVEN IF YOUR VOICE SHAKES!”**

**- Maggie Kuhn**

**“IN POLITICS, NOTHING HAPPENS BY ACCIDENT. IF IT HAPPENS, YOU CAN BET IT WAS PLANNED THAT WAY!”**

**- Franklin D. Roosevelt**

# योद्धा-

## रोमित चव्हाण

<u>ही कादंबरी सत्यघटनेवर आधारित पण काल्पनिक आहे.</u>


WE SALUTE OUR BRAVEHEART
SEP CHAVAN ROMIT TANAJI
AGE : 22 YEARS 11 MONTHS
UNIT : RASHTRIYA RIFLES (PARENT UNIT- MAHAR REGIMENT)

# उपोद्घात...

गडबड गोंधळाचा आवाज वातावरणात भरून राहिला होता. असंख्य गोळ्या चालवल्या जात होत्या, त्या आवाजाची तीव्रता इतकी होती, की कानांना ती सहन करणे अशक्य झाले. जखमी आणि मृत्यू पडणाऱ्यांच्या आर्त किंकाळ्या त्यात मिसळल्या होत्या, आवाज वाढत जात होता. अचानक, एक गोळीचा मोठा 'ठो' ऐकू आला, आणि त्याच क्षणी ती गोळी लागलेल्या कोवळ्या तरुणाचा एक 'अक्'चा उच्चार!

सर्वत्र शांतता पसरली. या शांततेत क्षण काहीकाळ थांबला...

‘मृत्यू... अटळ सत्य. स्वयं परमेश्वरालाही ते कधी चुकलं नाही. मरण, अंत; प्राणोत्क्रमण; देहावसान; देहान्त; शेवट; चिरनिद्रा; देवाज्ञा; निर्वाण; अखेर; काळदाढ, अशी अनेक नांवं त्याची. जन्माला आला, तो जायचाच. जन्म आणि मरण यांच्या मधला प्रवास म्हणजे जीवन. आता हे जीवन जगायचं कसं, हे माणूस जो तो आपापला ठरवतो.

जगणं व्यर्थ घालवून आपलं मरण अर्थहीन करायचं, की एका विशिष्ट ध्येयासाठी झगडत आपल्या जगण्याला अर्थ प्राप्त करून घ्यायचा, हा प्रत्येकाचा निर्णय आहे. दोन्ही प्रकारचं जगणं हे जगणंच आहे, पण दोन्हीतील कुठलं जगणं स्वीकारायचं हे आपल्याला ठरवायचं आहे.

a

बुद्धीहीन प्राण्यांसारखं आपलं आयुष्य फक्त खाणं आणि निजणं यात खर्ची घालायचं, की मानवतेला आपल्या असण्याचा काही हातभार लागेल असं काही काम करून जायचं.

हो! अशीही लोकं असतात, जी माणसाच्या आणि माणुसकीच्या रक्षणासाठी आपलं जगणं ओवाळून टाकतात. त्यांच्या डोळ्यांसमोर एकच ध्येय असतं: माणूस टिकला पाहिजे! माणुसकी टिकली पाहिजे! आणि यासाठी ते अगदी आपले प्राण देखील गमवायला मागे पुढे पाहत नाहीत.

अशाच एका धाडसी योध्याची ही कहाणी, जो माझ्या पेठ वडगांव शहराच्या जवळच्या शिगांव या सांगली जिल्यातील वाळला तालुक्यातल्या गांवात जन्मला, वाढला, आणि अखेर नागरिक म्हणून आपल्या आणि आपल्या देशाच्या रक्षणासाठी जीव तळहातावर घेऊन लढला... त्याचं नांव... 'रोमित चव्हाण.'

ज्या क्षणी भारतीय सेनेत भरती होण्यासाठी रोमित चव्हाणने आपल्या घराचे आवार सोडले, त्या क्षणी त्याच्या मनात एकच विचार होता—"त्याचा देश भारत व त्या देशातील भारतीय नागरिक यांची सुरक्षा!"

a

१...




सुरवातीला सांगितलेल्या अनपेक्षित घटनेची सुरवात काहीशा सौम्य पद्धतीने झाली होती. इतकी की पुढे काही अनिष्ट घडेल अशी पुसटशी चाहूल लागणे देखील शक्य नव्हते. असो;

साल, २०२२! महिना ऑगस्ट. रोमितचे घर, गल्ली सजली होती. गणपती बसले ती गणेश चतुर्थीची रात्र होती. गल्लीत गणपतीची आरती करण्यासाठी सगळे सज्ज झाले होते. रंग-बिरंगी दिव्यांनी सजलेली घरे आणि मंडळाचा तो भव्य देखावा व थाट, त्यात उंचावर बसलेला गणपती! त्याच्या भक्तांच्या मनात एक आगळं विश्व निर्माण झालं होतं. त्या गडबडीत, आर्मी गणवेशातला बावीस वर्षीय उमदा रोमित आपल्या सॅकबॅगसह तिथं आला.

a

गल्लीतील गणेश मंडळाची आरती चालू असताना त्या आरतीत एक मध्यमवयीन स्त्री सर्वांमागे आरतीला उभी होती. अचानक रोमितने तिच्या खांद्यावर हात ठेवला. ती स्त्री थोडीशी चकित झाली, आणि तिच्या चेहऱ्यावर एक गूढ स्मित उमललं. तिच्या मनात एकसारख्या भावना जाग्या झाल्या—एकटेपणा, प्रेम, आणि दुरावा.

तिला रोमितचं रूप पाहून हळूहळू हृदयात एक लाट उभी राहिली. किती दिवस, किती महिने, त्याची ती वाट पाहत होती. तो परत आला होता, तिचा बाळ. त्याला असा अनपेक्षित पाहून तिच्या हृदयाच्या गाभ्यातले सारे दु:ख, प्रेम, आणि उत्सुकता काठावर आणत ती त्याला न्याहळत होती.

रोमित तिच्या पायांवर गळाला. "आई," तो म्हणाला, "मी परत आलो आहे."

ती स्त्री, जिने तिचं संपूर्ण जीवन ज्याला समर्पित केलं होतं, तो तिचा सुपुत्र रोमित याच्या आवाजातल्या अनुनासिकतेने ती थोडीशी चुरचुरीत झाली. तिचे डोळे पाणावले.

"गणपतीचा आशीर्वाद घे," ती पाणावलेल्या डोळ्यांनी रोमितला म्हणाली, "आणि गणपतीच्या आरतीत सामील हो." गहिवरून आलेल्या तिच्या आवाजात जिव्हाळा होता.

a

रोमित तिच्या खांद्याला धरून उभा राहिला, त्याने आशीर्वाद घेतला आणि गणपतीकडे वळून आरतीमध्ये सामील होण्यासाठी हळूच पाऊल टाकलं. त्याच्या मनात एक नवीन सुरुवात होती—प्रेमाची आरती, आईच्या आशीर्वादाने सजलेली.

गणपतीच्या भव्य देखाव्यात उभे राहून, दोघांनी इतर भक्तांसोबत एकत्रितपणे आरती केली. त्या क्षणी, ममत्वाच्या प्रेमाचे साक्षात एक अनमोल बंधन अधोरेखित होत गेले.

***

दुसरा दिन उजाडला. रोमित घरी आल्याने एक उल्हास भरला होता सपूर्ण घरात. रोमितच्या घरात एक शांतता होती. वडील चहा घेत बसले होते. रोमित आतून माळीत आला. वडिलांच्या पायावर पडला. वडिलांनी त्याला आपल्या बाजूला बसवले.

“मग? परत कवा?” वडीलांनी मस्करीत त्याला विचारले.

तत्काळ, आई आतून चहा घेऊन आली.

“काय ती आगळीक! पोरगं कालच आलंय तर असं ईचारताय?” तिने आश्चर्याने आणि थोडे रागाने विचारले.

रोमितने चहा घेतला आणि हसला, “ती काय प्रायव्हेट नोकरी आहे व्हय? पायजे तवा यायला?”

वडिलांनी रोमितच्या मांडीवर थोपटून उत्तर दिले, “कळत नाय व्हय आमाला? पण आठवण याची ऱ्हात्या व्हय?!”

“मला पण इत्या आठवन,” रोमित म्हणाला, “आता हाय काई महिने.”

“जास्त राहून कोस इथं. सवय झाली, की परत जायचं मन नाय हुत,” वडीलांनी गंभीरपणे सांगितले.

रोमित विचारात पडला. त्याचवेळी, बाहेरून एक आवाज आला.

“रोमित!” दारातूनच एक मित्र जोरात ओरडला होता.

“आली चांदाळ चौकडी!” वडीलांनी चेष्टा केली.

रोमित हसला, “काय पण काय?”

“मग? आलाय तर आमच्या बरोबर वेळ घालवायचं, तर तू मित्रांबरोबर भाईर,” वडील बोलले.

“माणसं जपायला लागत्यात आणि मित्र तर त्याऊन जपायला लागत्यात,” आई वडलांना म्हणाली.

वडील आईला म्हणाले, “ते काय कळत नाय व्हई?! बस इथंच. मी हाय आत.” ते रोमितला बोलले.

आणि वडील उठून आतल्या खोलीत गेले. आईही स्वयंपाक घरात निघून गेली. नंतर लागलीच दोन मित्र आत आले.

“आमाला चुकवून?” रोमितला चहा घेताना बघून संदीपने रोमितच्या उजव्या बाजूला बसत विचारले.

दुसरा मित्र, शिवा, रोमितच्या डाव्या बाजूला बसला.

“ह्योच घे!” रोमितने संदीपच्या समोर चहा धरला.

a

“दुसरा आनत्यारे बाळांनो!” आईने आतून आळवले.

संदीपने ओरडून सांगितले, “नाय काकी हाय ह्योच घेणारे आहे. आओ मैत्री वाटण्यात हाय. काय?” असे म्हणत त्याने चहा बशीत ओतत कप शिवाला दिली.

“आता बघा की आमी आल्यानं तुमच्या मुलानं तेचाच्यां आमाला दिला,” संदीप हसत पुढे म्हणाला.

“मी येनारच हुतो की. तुमी कशाला आलात?” रोमितने दोघांना विचारले.

“आलो नसतो, तर काकींच्या हातचा च्या प्याला मिळाला असता का?” शिवा उपहासाने म्हणाला.

“जिऊनच जावा आता?” रोमितने त्याच्यावर उपहास केला.

“तेवढं नको,” शिवाने रोमितचा खोचकपणा लक्षात येऊन उत्तर दिलं, आणि संदीप शिवा दोघेही हसले.

“कसं आला एवढ्या सकाळी?” रोमितने विचारलं.

“माझ्या भावाला श्रवणला आर्मीत जायचंय. तुला भेटायला आलोय त्यासाठीच,” संदीपने उत्तर दिलं.

“कुठाय त्यो?” रोमितने चौकशी केली.

एवढ्यात बाहेरून हॉर्नचा आवाज ऐकू आला.

“हा काय आलाच,” संदीप म्हणाला.

आणि तो उठून दरवाजापर्यंत गेला. भावाला घेऊन रोमित जवळ आला व आपल्या पूर्व जागी बसला. संदीपच्या मित्राला पाहून रोमित आर्मीच्या आवेशात ताठ उभारला.

“ताठ उभा राहा!” रोमितने श्रवण बजावले.

रोमितचा हुकुमी आवाज ऐकूनच श्रवण पाठीतून ताठ झाला.

a

“पहिला नियम, वेळ पाळणे! वेळेत चुकलात; तर आयुष्यातून चुकलात!” रोमित श्रवणला शिकवण देत बोलला.

“मी… लक्षात ठेवीन,” श्रवणने आश्वासन दिलं.

“बस,” रोमितने आदेश दिला. आणि श्रवण बसताच रोमितने आपलं बोलणं चालू ठेवलं,

“एक लक्षात ठेव, आर्मी म्हणजे आपलं लाइफ सेफ आणि सिक्योर करायचं करियर नाही! तसं जर समजत असशील, तर डोक्यातून काढून टाक! कारण मग तू कधीच तुझ्या ध्येयापर्यंत पोहोचणार नाहीस!” रोमितने स्पष्ट केले.

“होय,” श्रवणने मान्य केले.

“तुझ्या जरा गोष्टी सांग हेला, म्हणजे काय तरी मार्गदर्शन मिळालं हेला,” त्यांचे संभाषण वडिलांना आत ऐकू जात होते. ते बाहेर येऊन रोमितला म्हणाले.

“लहानपणापासून नेहमीच एकच डोक्यात होतं. आर्मीत जायचं. देशसेवा करायची. देशाचं, देशातल्या माणसाचं रक्षण करायचं. १७ मार्च २०१७ ला म्हणजे ५ वर्षांपूर्वी मुंबईतून आर्मीत भरती झालो. मध्यप्रदेशच्या सागर इथल्या महार रेजिमेंटल सेंटरवर माझं एक वर्ष ट्रेनिंग झालं. सध्या जम्मू काश्मीरला पोस्टिंग हाय माझं,” रोमितने सांगितले.

“बर्फ बघितला असशील. न्हवं?” शिवा उत्सुकतेने विचारलं.

"अरे, बर्फातच बसायला लागतंय भावा! हिवाळ्यात तर जीव जाईल अशी परिस्थिती असत्या," रोमितने हसून उत्तर दिलं.

"मानलंच पायजे तुम्हाला भावा," संदीपने कौतुकाने म्हणाला.

"देशाची सुरक्षा पाहायची म्हंटल्यावर विचार करून चालतंय व्हय?" रोमित म्हणाला.

"बरोबरच हाय म्हणा. बग. शिक काय तर. लक्षात ठेव दादा काय सांगतोय," संदीप आपला भाऊ श्रवणला म्हणाला.

"होय," श्रवणने मान डोलवून उत्तर दिलं.

तत्काळ, आई आणखी एक चहा घेऊन आली.

"त्याला दे," रोमितने आईला निर्देश दिला.

आईने तसेच पुढे होत श्रवणला चहा दिला, पण रोमितकडे फक्त एकटक बघत राहिली. रोमित चहा घेणाऱ्या श्रवणला अंतिम उपदेशपर बोलला...

"ध्यानात ठेव! राष्ट्रप्रथम!"

"आई वडीलांचं मग काय नाहीच का?" आईने मागे होत विचारले.

"आई, कोणीही पेक्षा देश मोठा! हेच शिकवलं जातं आमाला. आई वडील जन्माला घालत्यात म्हणून तेंची जागा मोठीच, पण देश ही भावना सर्वांना एकत्र आणते आणि त्याच भावनेचं रक्षण करणं हे कर्तव्य त्यापेक्षा मोठं नाय काय? कोणत्याही धर्म-जातीपेक्षा वर उठून माणसाला माणसाशी एका धाग्यात जोडणारी ही देश नांवाची संकल्पना किती तरी मोठी! तिचं रक्षण करणं किती भाग्याचं आहे काय सांगू तुला? देश जमीनने नाही बनत आई, देश बनतो इथल्या माणसांनी! त्यामुळं त्यांची एकी टिकली पाहिजे. इथली माणसं टाकावी, त्यांची एकी टिकावी म्हणून आम्ही तिथं सीमेवर असतो!" रोमितने स्पष्टपणे सांगितले.

आईने चहा संपलेले कप गोळा करत निराश स्वरात उत्तर दिले, "हे सगळं देशाच्या आत राहनाऱ्याला लोकांना कळाय पायजे नव्हं पन." आणि आई आत निघून गेली.

"नाय पण काकी म्हणत्यात ते बी बरोबर हाय. आपल्या इथली लोकं सारखी काय ना काय कारण काढून भांडतच अस्त्यात," संदीप खंतावत बोलला.

रोमित त्याला दिलासा देत बोलू लागला,

"हा देश एक कुटूंब म्हणून पाहाय पायजे, म्हणजे मत भेदात किती पण भांडणं झालं, तरी मनभेद व्हायची नाहाईत. बघू, कदीतरी होईल हे. पण तोपर्यंत..." स्मितावत त्याने श्रवणकडे बघितलं आणि उत्साही म्हणाला, "ट्रेनिंग सुरू ठेवावा! काय?!" श्रवणचा दंड जोरात थोपटत तो हसला.

श्रवण देखील मान डोलवत हसला.

२...

आणि दिड-दोन महिने असे निघून गेले, जसा कापूर वाऱ्याच्या संपर्कात आल्यावर उडून जातो. या दरम्यान आलेल्या प्रत्येक सणात रोमितने हिरिरीने भाग घेतला. गणपतीच्या उत्सवात त्याने उत्साहाने भाग घेतला होताच, त्यानंतरचा दसरा साजरा करताना त्याच्या चेहऱ्यावर एक वेगळाच आनंद होता. मग आली ती दिवाळी, रंगीबेरंगी रांगोळ्या, दीपांच्या झगमगाटात त्याचे कुटुंब एकत्रित उत्साही होते.

दिवाळीचे चार दिवस आनंदात गेले, पण या आनंदाच्या काळात, त्यांच्या कुटुंबावर एक अनामिक चिंतेची सावली होती. त्यांना येऊ घातलेल्या संकटाची किंचितशी चाहूल लागली नव्हती. हे संकट फक्त त्यांच्या घरावर नाही, तर देशावर कोसळणार होतं.

रोमितच्या मनातला उत्साह त्याच्या कुटुंबाच्या प्रेमाने भरला होता, परंतु उगवणाऱ्या काळ्या ढगांची सावली त्यांच्या मनात होती. सीमेवर काय स्थिती आहे याकडे त्याचे ध्यान होते. मात्र या आनंदाच्या क्षणांनी त्यांना आपल्या दैनंदिन समस्यांपासून दूर ठेवले होते, पण ती शांतता त्यांच्या जीवनात येणाऱ्या भयंकर घटनांची आधीची तयारी होती.

दिवाळीच्या रात्री, चंद्राच्या मंद प्रकाशात, रोमितला एक विचार सतावू लागला. “या आनंदाच्या पार्श्वभूमीवर, पुढे काय?”

***

रोमित नवीन कपडे घालून, गांधी टोपी घालून पाटावर बसला होता.भाऊबीजेचा दिवस होता तो. त्याची लहान बहिण त्याला कुंकवाचा टिळा लावून ओवाळत होती.

रोमितने औक्षणाच्या ताटाला नमस्कार केला आणि हसत बहिणीला विचारलं, “काय गिफ्ट देऊ?”

बहीण हसली, “करोडो बहिणी आणि त्यांच्या भावांचं रक्षण करून सगळ्यात मोठं गिफ्ट तर देत आहेस, अजून काय मागू दादा?”

रोमित गहिवरला. ओल्या डोळ्यांनी तो बहिणीच्या डोक्यावर हात ठेवून तिला आशीर्वाद देत होता. अचानक त्याचा फोन वाजला.

कॉल घेतल्यावर, पलिकडून आवाज आला, “इमर्जन्सी आहे, लवकर रुजू होण्याचे आदेश आहेत!”

a

“जी श्रीमान!” रोमितने उत्तर दिलं आणि फोन कट झाला. त्याने मोबाईल खाली ठेवला.

“काय झालं दादा?” बहिणीने विचारलं.

“रुजू होण्याचे आदेश आहेत,” रोमितने सांगितलं.

“इतक्यात...” आईने दाटलेल्या आवाजात सुरुवात केली.

“झालं की आता चार पाच महिनं? का पोराला हितच दावणीला बांधून ठेवायचाय?” वडील म्हणाले, “प्रत्येक आई-बानं असाच ईचार केला, तर देशाचं कसं व्हायचं? पोरगं आपलं कर्तव्य पार पाडायला जातंय, तर गुमान जाऊ द्यावं. उगा त्याच्या पायात जोखड आडकवण्यात काय हाशील? आपणच त्याच्या मार्गातला रोडा झालो, तर ठेच लागल्या बिगर राहील काय? गप रडू नकोस. मोकळ्या मनाने जाऊ दे तेला.”

रोमितच्या डोळ्यात अश्रू आले. तो आई-वडिलांच्या पाया पडला आणि खोलीकडे वळला. तेवढ्यात,

“दादा!” बहीण हुंदका अनावर होऊन म्हणाली.

ती पटकन जाऊन त्याला बिलगली, घट्ट मिठी मारत म्हणाली, “परत ये! एवढी एकच भाऊजींची ओवाळणी टाक.”

रोमितच्या मनात एक दाट भावना संचारली, तो बहिणीच्या मिठीत हरवला होता, परंतु कर्तव्याच्या आह्वानाने त्याला मनाने केव्हाचे युद्धभूमीवर नेऊन उभे केले होते.

***

आणि निघाला तो मायभूमीवरील येऊ घातलेल्या आपत्तीला तोंड द्यायला. दिवाळीत जनता फटाके उडवीत होती, पण रोमित आणि त्याचे सहकारी त्यांच्या जीवनाच्या सर्वात मोठ्या लढाईसाठी सज्ज झाले होते. त्यांचे मन ताठ होते, कारण आता शत्रू विरुद्ध खऱ्या बंदुकांचे बार काढण्याची वेळ आलेली होती. इकडे भारतीय जनता सर्व कायाकलाप आणि संकटांपासून अनभिज्ञ फटाके उडवून दिवाळी साजरी करणार होती आणि तिकडे भारतीय जवान खऱ्या गोळयांचे बार शत्रू विरुद्ध काढून त्यांच्या रक्ताने होळी खेळणार होते...

शांत रात्रीच्या आकाशात फटाक्यांच्या प्रकाशात, रोमितच्या मनात एक विचार घर करून होता—'जर आपल्या जवानांनी येऊ घातलेल्या संकटाला धैर्याने तोंड दिलं नाही, तर काय होईल?' याच विचाराने त्याला भेदक धडकी भरली. पण रोमितला माहीत होतं, आपल्या जवानांच्या मनगटावर असलेल्या शक्तीवर विश्वास ठेवणं हे आवश्यक होतं. 'हे जवान हताश होतील का? खचितच नाही! हे तर आपले वीर आहेत!' आपली शंका झटकून तो पूर्ण विश्वासाने स्वतःलाच म्हणाला.

a

प्रवासभर त्यांच्या डोळ्यातील निर्धार आणि सामर्थ्याची ज्वाला, सर्व भयावर मात करण्यास सज्ज होती. रोमितने हसून स्वतःशी उद्देशून म्हटलं, 'आम्ही इथे एकत्र आलोय. आपल्याला मिळून हे संकट पार करायचं आहे बंधूंनो. गप्प बसणं हे आपल्यासाठी नाही!'

***

रक्ताची होळी खेळण्याच्या तयारीत, रोमित आणि त्याचे सहकारी अखेर सीमेवरील आर्मी कॅम्पमध्ये एकत्रित झाले. शत्रूचा सामना करण्यासाठी त्यांची इच्छा आणि साहस, एक नवा प्रकाश घेऊन आले होते. येऊ घातलेल्या युद्धाची तीव्रता भासू लागली होती, पण त्यातही एकजुटीचं बळ त्यांच्या हृदयात भरून आलं होतं.

जगण्याची आणि देशाची रक्षण करण्याची ही एक संधी होती, आणि रोमितला ती वाया जाऊ द्यायचा नव्हता. 'चल, जाऊ या! मायभूमीच्या रक्षणासाठी!' असा मनाशीच उत्साही नारा देत त्याने तेथे उपस्थित सर्व साथी जवानांना हाक दिली.

उत्साहाने भरलेले ते क्षण, एक नवा अध्याय सुरू करण्यास तयार होते.

३...

जम्मू-काश्मीरमधील एक गांव...

रात्रीचा काळ, आकाशात काळ्या ढगांचं थैमान. गांवात अंधुक प्रकाश चमकत होता. वातावरणात फक्त गोंगाट आणि श्वासांचा आवाज ऐकू येत होता. प्रत्येक पावलागणिक त्यांची जागरूकता वाढत चालली होती. त्यांचे लक्ष आता समोरच्या घराकडे होते. अरुंद रस्ता, रोमित आणि त्याचे साथीदार सावधपणे पाऊल टाकत आहेत. ते एका घराकडे जात असताना, अचानक बंदुकीच्या गोळ्यांचा आवाज ऐकू आला. सगळीकडे शांतता असूनही, त्यांच्या मनात दहशत आणि ताण निर्माण झाला होता. शांततेचे ओझे होते त्यांच्या मनात...

“हमें जल्दी कुछ करना होगा! अंदर नागरिक हो सकते हैं,” वरिष्ठ अधिकारी आपल्या साथीदारांना आदेश देत म्हणाला.

रोमितने मोठ्या धीराने उत्तर दिले, “अगर होंगे भी तो उनकी सुरक्षा हमारी प्राथमिकता होगी श्रीमान! चाहे कोई भी कीमत चुकानी पड़े!” त्याच्या आवाजात ठराविकता आणि धाडस होते.

a

परंतु, अचानक चारी बाजूंनी त्यांना बंदुकीच्या तोंडाखाली घेतलं गेलं. अतिरेकी त्यांच्यावर बंदुका ताणून उभे होते.

जवान पुढे जाताच आणि आपल्या बदुकांच्या टप्प्यात ते आलेत हे ओळखून आतंकवाद्यांकडून त्यांच्यावर लपून गोळीबार सुरू झाला होता. रोमित आणि त्याचे साथीदार त्यांच्यावर पलटून गोळीबार करत होते.

या वेळी, अंधारात एकांताचा गूढ आवाज आणि उधळलेल्या गोळयांची सळसळ ऐकू येत होती. जेव्हा गोळीबार बंद झाला, रोमित सावधगिरीने पुढे झाला आणि घरात लक्षपूर्वक डोकावून त्याने पहिला आवाज दिला,

“ऑल क्लिअर! अंदर कोई नहीं!” तो चित्कारतो.

तितक्यात, पुन्हा चार बाजूंनी त्यांच्यावर हल्ला सुरू झाला. त्यांच्या वर बंदुक पुन्हा एकसारख्या झडत होत्या, पण रोमितने चातुर्याने अतिरेक्यांवर उलट हल्ला चढवत त्यांचे लक्ष वेधून घेतले.

तोच, एका कोपऱ्यात बसलेला एक आतंकवादी अचानक बाहेर आला. त्याने एका सैनिकाला पकडले. रोमितने धैर्य दाखवून पुढे होत त्या अतिरेक्याचे अचूक मस्तक भेदले व सावधपणे आपल्या सहकाऱ्याला बाजूला केले.

a

"ध्यान से!" तो त्या सहकाऱ्याला सूचित करत म्हणाला, नंतर जवानांनी मिळून त्वरित त्यांच्या गोळ्यांनी तिथल्या सर्व आतंकवाद्यांना कंठस्नान घातले.

रोमितची कामगिरी पाहून त्या टीमचे नायक रोमितवर बेहद्द खुश झाले.

"अच्छा काम किया! मिशन पूरा करते वक्त अपने साथी की सुरक्षा पर ध्यान देना भी उतना ही जरूरी होता है, जितना मिशन पूरा करना। और तुम यह बात अच्छी तरह से जानते हो। गुड जॉब, सिपॉय रोमित चव्हान!" वरिष्ठ अधिकारी रोमितकडे येत त्याला प्रोत्साहन देत होते.

रोमित लहानसं हसून म्हणाला, "शुक्रिया श्रीमान!"

आणि तो थोडा मागे झाला. त्याने बंदूक उंचावून विजयाच्या आवेशात गर्जला, "बोलो हिंदुस्थान की जय!"

सर्व सैनिक एकत्रित होऊन त्याचे अनुकरण करत विजयाच्या आवेशाने उद्गारले, "हिंदुस्थान की जय!" त्यांच्या आवाजात एकत्रित शक्ती आणि एकजुटीचा अनुभव जाणवत होता, ज्या त्यांच्या देशभक्तीतून प्रसवत होता.

***

a

तीन महिने असेच आतकवाद्यांशी संघर्षात गेले. दररोजच्या तणावात, युद्धाच्या काठावर उभ्या त्या सीमेवर रोमित आणि त्याचे बटालियनचे जवान कटाक्षाने पहारा देत होते. आतंकवाद्यांचं एकही पाऊल त्यांच्या भारतभूमीच्या मातीवर पडू नये यासाठी ते जणू डोळ्यांत तेल घालून जागरण करत होते. प्रत्येक सैनिकाचा चेहरा तणावाने झळकत होता, मात्र देशाच्या रक्षणासाठी त्यांची निष्ठा कमी झाली नव्हती. त्यांचा प्रत्येक क्षण सज्ज होता, आणि प्रत्येक श्वास सतर्कतेने भरला होता. त्यांचं कणखर धैर्य हेच त्यांच्या शत्रूसाठी भारताची एक भक्कम तटबंदी होती.

परंतु शत्रू धूर्त असतो. कितीही दक्षता पाळली, तरी डाव साधण्यासाठी तो पद्धत शोधतोच. एक क्षण मिळाला, की त्याचा वापर करतोच. आतापर्यंत सर्व काही ठीक चालले होते, पण एके दिवशी, त्याच सावध वातावरणात एक फट पडली··· आणि तीच शत्रूसाठी एक संधी बनली.

आणि त्यामुळे आता रोमितच्या बटालियनसमोर एक मोठा आव्हान उभं ठाकलं होतं.

४...

रोमित आणि त्याचे शूर साथीदार नव्या ऑपरेशनसाठी मिलिटरी कॅम्पमध्ये सज्ज झाले होते. सर्वजण विश्राम स्थितीत, मागे हात बांधून शांततेत शिस्तबद्ध उभे होते. वातावरणात एक अकथित भीती आणि एकत्रित साहसाची जडता होती; त्या शांततेतही एक प्रकारचा थरार दडलेला होता.

वरिष्ठ अधिकाऱ्याने कडक आवाजात आदेश दिला,

"इंटेलिजेंस से खबर आई है, शोपिया जिले के जेनपुरा गाँव में कुछ आतंकी छुपकर बैठे है। हमें उन्हें ढूंढ निकलना है। यहीं आपका नया मिशन होगा!"

सर्वजण एकाच सुरात उत्तरले, "समझ गए, श्रीमान!"

वरिष्ठ अधिकारी पुढे म्हणाले, "ये शायद आप लोगों का आजतक का सबसे कठिन मिशन रहेगा। क्या तुम सब तैयार हो?"

सर्वांनी निर्धारपूर्वक उत्तर दिलं, "देश के लिए हमेशा तैयार, श्रीमान!!!"

वरिष्ठ अधिकारी रोमित समोर येऊन थांबले, "डरोगे तो नहीं?"

a

रोमितच्या चेहऱ्यावर आत्मविश्वासाची झळक उमटली.

“मौत से डरना भारतीय सेनाने सिखा नहीं श्रीमान! हमने ट्रेनिंग ही इसलिए ली है श्रीमान, की हम बिना डरे डटकर दुश्मन का सामना और उनका खात्मा कर सके! कुछ भी हो, हम एक साथ दुश्मन का सामना करेंगे! मौत भी दिखे तो पीछे नहीं हटेंगे! जो कार्य हाथ में लिया है, उसे मरकर भी पूरा करेंगे! हमारे महार रेजिमेंट का मोटो ही है - यश सिद्धि!”

वरिष्ठ अधिकारी मागे सरकले आणि गर्वभऱ्या छातीने कौतुकाने म्हणाले, “यही जज्बा कायम रखो! पर याद रहें! हमें मरना नहीं है! हम अकेले नहीं है! हमारा देश एक परिवार बनके हमारे साथ खड़ा है। उनके लिए हमे लड़ना है, उनकी रक्षाके लिए...”

“सदैव तत्पर!” असे सर्वजण त्यांच्या वरिष्ठाचे वाक्य पूर्ण करत एकसुरात उद्गारले.

त्यांच्या हातातली बंदुका उंचावल्या गेल्या आणि एकच एल्गार झाला तो म्हणजे, “बोलो हिंदुस्तान की जय! जय हिंद!”

सैनिकांचा आवेश शांत होताच वरिष्ठांनी त्यांना कुटुंबीयांशी बोलून घेण्याचा सल्ला दिला, “अपने परिजनों से बातचीत कर लो! हमें लड़ाई ऐसे

a

लडनी होती है, जैसे वह हमारी आखरी लडाई है, यह बात अबतक आपलोग समझ गये होंगे!”

त्यावेळी ते अंतर्मुख होऊन एकमेकांकडे पाहून मूक समजुतदार क्षण शेअर करत होते. लष्करी छावणीवरील दिवे मंद होत गेले.

फेब्रुवारी २०२२ ची ती संध्याकाळ होती. सिपॉय रोमित चव्हाण कार्यरत असलेल्या 'वन आर आर' युनिटला जम्मू आणि काश्मीरच्या शोपियान जिल्ह्यातील नियंत्रण रेषेवर तैनात केलं होतं. शत्रूच्या दहशतीखाली असलेल्या त्या परिसरात नेहमीच उच्च पातळीवर तयारी राखावी लागत असे, कारण तिथे अतिरेकी कायमच सक्रिय होते. गुप्तचर स्रोताकडून आलेल्या माहितीनुसार, शोपियाच्या क्रेमर्ग भागात काही कट्टर अतिरेकी असल्याचे समजले होते. १९ फेब्रुवारी २०२२ रोजी, सुरक्षा दलांनी या भागात शोध आणि घेराबंदी मोहीम सुरू करण्याचा निर्णय घेतला. रोमित चव्हाण, या मोहिमेसाठी नेमलेल्या टीमचा एक महत्त्वाचा भाग होता. त्याचं धैर्य आणि जिद्द पुन्हा एकदा कसोटीला लागणार होते.

***

a

घरातलं वातावरण एक प्रकारे उदास होतं. खूप दिवसांनी रोमितला ते व्हिडीओ कॉलवर पाहत होते, त्याच्याशी बोलत होते. त्याचा फोन आला, की तो कोणत्यातरी नव्या मिशनवर निघणार आहे हे त्यांना साहजिक उमगणारे होते.

असो, तर कुटुंब सगळे एकत्र जमले होते, आणि रोमित व्हिडिओ कॉलवर त्यांच्याशी बोलत होता. बहिणीने आई-वडील यांच्या मध्ये बसून मोबाईल हातात घेतला होता. रोमितच्या आवाजात एक वेगळाच निर्धार जाणवत होता, जो त्याच्या शब्दांतून अधिकच स्पष्ट होत होता.

तिकडे रोमित बर्फात बसून आपली बंदूक उराशी बाळगून चौकस पहारा देत मोबाईलवर बोलत होता. एका कोपऱ्यात अंग चोरून, त्याच्या "संगीनी"सोबत – म्हणजे बंदुकीसोबत – तो शांत बसला होता. त्या क्षणात त्याच्या चेहऱ्यावर एक प्रकारचं सामर्थ्य आणि थोडासा थकवा झळकत होती, परंतु त्याच्या उर्मी पुढे तो थोटका पडत होता खचितच.

"कसा आहेस पोरा?" वडिलांनी प्रेमाने विचारलं.

"ठीक आहे बाबा," रोमितने आश्वस्त करण्याचा प्रयत्न केला.

पण वडिलांच्या चेहऱ्यावर तरीही थोडीशी चिंता होती.

आईने नाराजीने रोमितकडे पाहिलं, “वाळलायस बघ, केवढा झालायस? आणि म्हणे बरंय!”

“तुझ्या हातचं जेवण नाही ना इथं!” रोमितने हसत उत्तर दिलं, “आता परत आलो, की तू केलेली तूप रोटी खाईन. जाडजूड होईन बघ!” आईच्या चेहऱ्यावरची भीतीची छटा ओळखून ती सैल करण्यासाठी मस्करी केली होती. आई हसावी असा त्याचा निष्पाप उद्देश होता.

रोमित आपली चेष्टा करतोय हे लक्षात येऊन आई उगे त्याला दरडावत म्हणाली,
“आगाऊ!” आईने त्याच्याकडे प्रेमाने पाहत टोमणा दिला होता.

वडील गंभीर होत म्हणाले, “बरं, फोन कशासाटी केलेलास? परत काई कामगिरी...”

क्षणात रोमितचं हसू थोडं मंद झालं. त्याच्या चेहऱ्यावर गंभीर भाव उमटले,
“आई, बाबा, मी एका नवीन मिशनसाठी निघालोय. हे मिशन खूप कठीण आहे. पण तुम्ही मला नेहमीच धाडसी व्हायला शिकवलंय. माझं मन तर

a

तिथं तुमच्यासोबत आहे, पण कर्तव्य बोलवतंय... देश बोलावत आहे,” रोमितने शांतपणे सांगितलं.

वडील पाणावलेल्या डोळ्यांनी मान हलवून म्हणाले,

“रोमित, तू एक समजूतदार, चांगला माणूस झालायस. एक योद्धा झालायस. आम्हाला तुझा अभिमान आहे.”

आईने थरथरत्या स्वरात म्हटलं,

“तो दर वेळी निगुन जातो, तेव्हा मला असं वाटतं, की माझं काळीज त्याच्यासोबत जातंय...”

“आई, मी पहिल्यांदा जातोय का?” रोमितने आईला धीर दिला, “पहिल्यांदा फोन करतोय का असं? नाही ना? हे मिशन संपवून परत आलो, की पुन्हा फोन करेन जसं प्रत्येकवेळी करतो. काळजी करू नकोस.” त्याच्या चेहऱ्यावर एक समजावणारा हास्य उमटलं होतं. “बरं, आता ठेवतो फोन.” आणि त्याने कॉल कट केला.

त्या फोन कॉलनंतर मोबाईल स्क्रिन वरची रोमितची बाजू हळूहळू अंधारात विरली, जणू काही त्या अंधारात त्याचं मनही एका वेगळ्या शांततेत विलीन झालं होतं.

घरात आई-वडील दोघेही थोडेसे बेचैन झाले. आईच्या चेहऱ्यावर एक भिती दाटून आली होती. त्यांना तसे पाहून मग, रोमितची बहीण त्यांच्या बाजूला येऊन म्हणाली,

“आई, आपला दादा खरा हिरो आहे. काळजी करू नकोस. बघ, काही दिवसात त्याचा फोन पुन्हा येईल.”

***

आणि उजाडली ती, १९ फेब्रुवारी २०२२ ची ती पहाट होती. सुरक्षा दलांनी गुप्त माहितीच्या आधारे एक मोठं ऑपरेशन राबवायचं ठरवलं होतं. लष्कर, सीआरपीएफ, आणि जम्मू-कश्मीर पोलिसांच्या स्पेशल ऑपरेशन ग्रुपच्या एकत्रित टीमने हे मिशन हाती घेतलं होतं. सिपॉय रोमित आणि त्याचे सहकारी, म्हणजे 'वन आर आर' युनिटचे सदस्य, शोपिया जिल्ह्यातील त्सरमार्ग गांवाच्या दिशेने निघाले होते.

त्या भागात संशयित घराच्या आसपास मोठी तणावपूर्ण शांतता होती. वातावरणात एक प्रकारचा थरार दडलेला होता. रोमित आणि त्याच्या टीमने त्या घराच्या दिशेने कारवाई करण्यास सुरुवात केली. त्याच क्षणी त्या घरातून अचानक गोळीबार सुरू झाला. धीरगंभीरपणे रोमित आणि त्याच्या टीमने नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी सगळ्यांना – विशेषतः महिला आणि मुलांना –

a

सुरक्षित ठिकाणी हलवण्यास सुरुवात केली आणि मग त्या दहशतवाद्यांना प्रत्युत्तर देण्यास ते सर्व सज्ज झाले.

तो दिवस रोमितच्या आयुष्यातील एक महत्वाचा क्षण होता; एक असा क्षण जो त्याच्या धैर्याचं प्रतीक ठरला. परंतु तोच क्षण त्याची परीक्षा सुद्धा घेणार होता...



५...

जेनपुरा...

शोपियाच्या जेनपुरा गांवातली ती थंडगार पहाट होती. सगळीकडे काळोख दाटलेला होता, फक्त मळकटलेल्या आकाशातून धूसर प्रकाश पडत होता. वातावरणात तणाव स्पष्ट जाणवत होता. लष्कराच्या जवानांनी गांवातील एका घराला वेढा दिला होता, आणि त्या वातावरणात प्रत्येक क्षण नाजूक वाटत होता. रोमित आणि त्याचा सहकारी संतोष त्यांच्या इतर सैनिक साथीदारांसोबत सावधपणे, शांततेत पुढे सरकत होते.

हा 'संतोष' म्हणजे 'संतोष यादव'. वडिलांचे नांव 'शेषनाथ' आणि आई 'मैनादेवी'. हा मूळचा उत्तर प्रदेशातील देवरिया जिल्ह्यातील रुद्रपूर तालुक्यातील तडवा गावचा. वय वर्षे २८. महार रेजिमेंट मधील युनिय 'वन आर आर'चा एक सिपॉय. रोमित सारखाच.

कपाळावर आलेला घाम पुसत रोमित संतोषला म्हणाला, “संतोष, इसी घर से कुछ देर पहले फायरिंग हुई है। लगता है, आतंकवादी यही है।”

a

संतोषने त्याला धीर देत उत्तर दिलं, “हा, पर हमें हमारे नागरिकों की सुरक्षा का इंतेजाम पहले करना होगा। हमें उन्हें यहाँ से बाहर निकालना ही होगा। वरना उनके जानको खतरा है !”

“ठीक कह रहे हो!” रोमितने त्याला अनुमोदन दिलं, आणि ते दोघं घराच्या दिशेने हळूहळू पुढे सरकू लागले.

तेवढ्यात गोळीबाराचा आवाज सुरु झाला. अचानक दुसऱ्या बाजूने एक घाबरलेली स्त्री धावत बाहेर आली.

“हमें बचाओ! आतंकीयों ने हमारे घर पर कब्जा किया है। मैं जैसे तैसे छूट आई हूं! पर मेरा बच्चा, मेरा परिवार अंदर खतरे में है।” ती घाबरलेल्या कातर स्वरात म्हणाली.

रोमितने त्या उद्विग्न स्त्रीला शांत करण्याच्या हेतूस्तव धीर देत सांगितलं,
“चिंता मत कीजिए। हम आप सबको बचालेंगे!”

रोमित, संतोष आणि इतर जवानांनी त्या स्त्रीला वेढा घातला व दुरक्षित ठिकाणी हलवलं.

a

ती स्त्री सुरक्षित स्थळी पोहोचताच, जवान पुन्हा त्या घराच्या दिशेने लक्ष केंद्रित करून सावधतेने पुढे सरकत राहिले. काही क्षण शांततेत गेले, आणि पुन्हा अनपेक्षितपणे जोरदार गोळीबार सुरू झाला.

गोळ्यांच्या सरबत्तीमध्ये संतोषला एक गोळी लागली, तो खाली पडला. रोमितने त्याला बाजूला ओढत सुरक्षित जागेवर आडोशाला नेलं.

जखमी संतोष वेदनेत असताना देखील ठाम स्वरात रोमितला म्हणत होता,

"हमे कुछ ठोस करना चाहिए। भले ही मैं जख्मी हूँ, पर हमें यह हमला रोकना ही होगा!"

दृढनिश्चयाने रोमित त्याला म्हणाला, "संतोष, तुम आराम करो। मैं वादा करता हूँ; हम हमारी आख़री सांस तक लड़ते रहेंगे। बस तुम जिने का हौसला मत खोना मेरे बडे भाई!"

वेदनेने संतोषने आश्वस्त करण्यासाठी रोमितच्या हातावर हलकेच थाप दिली, मान हलवून त्याला धीर दिला,

"तो जाओ!" तो कर्मकठोर म्हणाला.

त्याच्या निर्धाराने प्रेरित झालेला रोमित आवेशाने उठला, जवळ आलेल्या एका दहशतवाद्याचा खात्मा करून तो पुढे सरकू लागला. त्याच्या प्रत्येक हालचालीत एक ठामता दिसत होती.

मात्र, तेवढ्यात अनपेक्षितपणे खिडकीतून एका दहशतवाद्याने उडी मारून रोमितच्या दिशेने गोळी झाडली. गोळी रोमितच्या कानशिलावर लागली, आणि वेदनेने अस्फुट उद्गारत रोमित जमिनीवर कोसळला.

ते क्षण भीषण होते; आणि मग एकाच वेळी सगळीकडे झालेला गोळीबार शांत झाला. काही वेळाने सर्व काही शमलं, आणि आता फक्त शांती... शांती... पसरली होती.

थोड्या वेळाने रोमितचे वरिष्ठ आणि काही सैनिक पाहणी करत तिथं आले. संतोष मरण पावलेला होता, आणि रोमित जखमी अवस्थेत तसाच पडून होता. वरिष्ठांनी संतोष जवळ येत टोपी काढली, त्याच्या बलिदानाला मान दिला.

इतक्यात एक जवान जवळ येऊन वरिष्ठांना म्हणाला,

“श्रीमान, सिपॉय रोमित की सांसे चल रही है।”

वरिष्ठ रोमित जवळ आले, "रोमित कैसा लग रहा है?" त्यांनी आपुलकीने विचारले.

असह्य दुखण्यातून सुद्धा रोमितने विचारलं, "क्या हम कमियाब रहे?"

त्याला त्याच्या मिशनची आणि देशाच्या सुरक्षेचीच काळजी होती स्वतःपेक्षाही.

वरिष्ठांनी त्याच्या हातात हात घेत भावुकतेने त्याला आश्वासित करणारं उत्तर दिलं, "जी हाँ जवान!"

एक विजयी स्मित वेदनेतूनही वाट काढत रोमितच्या ओठांवर खिळलं.

रोमित बोलू लागला, "मेरे माता-पिता से कहना श्रीमान, के मैं उनसे बहुत प्यार करता हूँ, बहन से कह देना, की उसकी इच्छा मैं पूरी नहीं कर सका, इसके लिए मैंने उससे माफी मांगी है, अपने भाई को माफ कर दे। मन मैं मैल ना रखें।"

a

वरिष्ठांनी कठोरपणे त्याला धीर दिला, “जो कहना है तुम खुद उनसे कहोगे शिपॉय! पर अभी कुछ मत बोलो।”

“मुझे नही लगता श्रीमान, की मैं इसबार आप का ऑर्डर मान सकूँगा। मुझे इसके लिए माफ कर दीजिएगा श्रीमान। लेकिन मुझे अभिमान है, की मैं देश के लिए कुछ कर पाया, मेरा यह जीवन देश के काम आ सका। इसे एक अर्थ प्राप्त हुआ है श्रीमान... और इसलिए मैं मेरे इस आखरी वक्तमें बहुत गर्व महसूस कर रहा हूँ...” रोमितचा कण्हणारा आवाज मंदावत गेला...

वरिष्ठांना अश्रू अनावर झाले. “तुम्हे कुछ नहीं होगा शिपॉय! मैं मेरा एक जवान खो चुका हूँ, दूसरा नहीं खोना चाहता।” ते उदासीन स्वरात म्हणाले.

आणि मग त्यांनी त्यांच्या सोबतच्या दोन जवानांना हुकूम दिला, “सिपॉय संतोष के शव को साथ ले लो और सिपॉय रोमित को तात्काल अस्पताल ले चलो!”

त्या दोन जवानांनी आपल्या हातातील संगिनी खांद्यांवर मागे सारून रोमितला उचललं, आणि त्याला घेऊन निघाले. मागे संतोषाचा शांत मृतदेह जमिनीवर विसावलेला होता. त्यालाही दोन जवानांनी आस्थेने आणि आदराने सोबत घेतलं...

a

***

'रोमित तानाजी चव्हाण'ला उपचारासाठी आर्मी हॉस्पिटलमध्ये नेण्यात आलं, पण दुर्दैव देशाचं, की रोमितला त्याचे प्राण गमवावे लागले. भारत मातेचा आणखी एक सुपुत्र तिला रक्षणासाठी प्राणार्पण करून मुक्त झाला.

आपल्या मातृभूमीवर प्राणांतिक प्रेम करणारा आणि तिच्या रक्षणासाठी तत्पर असणारा तो भारतभूचा लाडका मुलगा अखेरच्या श्वासांमध्ये गर्वाने हसत निघून गेला.

त्याचे ते स्मित मृत्यूचीही कुचेष्टा करत होते, कारण आपल्या शौर्य आणि कर्तृत्वाच्या जोरावर मरून देखील अमर होता येते हे त्याने खुद्द मृत्यूला दाखवून दिले होते. त्याच्या बलिदानाने भारत माताही हमसून हमसून रडली असावी, तिचा प्रत्येक अश्रू त्याच्या वीरतेचं स्मरण करत आसमंतात उधळला गेला असावा हे निश्चित...

६...

मिलिटरी कॅम्पचं बाहेरील आवार. आज कॅम्प शांत होता. स्मशान शांतता भरून गेली होती. सगळे उदास होते... दिवसाचं तेज सगळीकडे पसरलेलं, पण वातावरणात एक गडद छटा मिसळलेली होती. शांतता पसरली होती, फक्त अधूनमधून होणारा पक्षांचा आवाज ऐकू येत होता. वरिष्ठ आपल्या केबिनच्या बाहेर, गंभीर मुद्रेत उभे होते, मागे हात बांधून त्यांनी संपूर्ण कॅम्पकडे बघत एक खोल श्वास घेतला. त्यांच्या मनात एक विचारचक्र सुरू होतं, पण त्याही परिस्थितीत त्यांनी स्वतःला कणखर ठेवण्याचा प्रयत्न केला होता.

तेवढ्यात, एक सैनिक त्यांच्या दिशेने आला. त्याच्या चेहऱ्यावर दु:खाचा एक वेगळा थर जाणवत होता. तीव्र दुःख दाबत त्याने वरिष्ठांना एक सल्यूट केला आणि थोडा वेळ शांत उभा राहिला. जणू काही शब्द सापडत नव्हते त्याला, तरी तो काहीशा अवकाशाने धीर एकवटून आपल्या संदेशाच्या प्रतीक्षेत उद्विग्न अधीर वरिष्ठांना म्हणाला, “श्रीमान, हमारे महार रेजिमेंट के यूनिट 'वन आर आर' के सर्विस नंबर : फोर फाईव नाईन झिओ नाईन नाईन टू एफ, सिपॉय रोमित चव्हाण हमारे बीच नहीं रहे श्रीमान... उन्हें देश के नाम शहादत नसीब हुई हैं।”

हे ऐकताच एखादे युद्ध हरल्यासारखे वरिष्ठांचे खांदे झुकले, त्यांची पाठीची शक्ती जणू गळून गेली. काही क्षणांतच त्यांच्या चेहऱ्यावर दु:खाचा

प्रतिध्वनी उमटला. ते शब्दावाचून स्तब्ध झाले. हळूहळू त्यांनी आपली टोपी काढली, आणि मनोभावे जमिनीकडे पाहत ते थोडा वेळ स्थिर उभे राहिले. त्यांचं मन रोमितच्या शौर्याच्या आठवणींनी भारावून गेलं होतं.

शेवटी ते वर बघून अथांग अवकाशाच्या खोल शून्यात पाहून हळुवारपणे म्हणाले, "तुम्हारा बलिदान जाया नहीं गया मेरे जवान। देश की सेवा करते हुए शहीद हुए ह तुमो। यह देश तुम्हें कभी नहीं भूलेगा।"

तो दु:खसंदेश घेऊन आलेला सैनिक शांतपणे, डोळ्यांतलं स्वतःचं दु:ख दाबून मान खाली घालून उभा राहिला. त्याच्या मनात एकच विचार होता – रोमितसारखा शूर जवान त्यांनी गमावला होता, पण त्याचं बलिदान त्याच्या देशासाठीच होतं.

***

इकडे गांवाकडे, दिवसाचा उजेड रोमितच्या घरातल्या ओसरीवर पसरला होता. घरात गडबड उडालेली होती; रोमितच्या घरातले कोणत्या तरी पाहुणांच्या नवीन घराच्या वास्तुकशांतीला बागणी या गावी जाण्याच्या तयारीत

a

होते. हे गांव सांगली जिल्ह्यातच शिगांवला लागूनच आहे. त्या कार्यक्रमाला जाण्यासाठीच तयारीत असलेल्या सामानांचा घरभर पसारा मांडला होता.

रोमितची बहीण पिशवी भरत होती, विविध वस्त्र आणि छोटे-मोठे सामान सांभाळत जपून जपून ठेवीत होती. त्या वेळी तिची आई आतून एक नवीन भांडे घेऊन गडबडीने येत म्हणाली, “अगं, आवर पटापट! अजून बराच वेळ लागणाराय का? कार्यक्रम झाल्यावर पोचायचाय काय आपल्याला?”

बहीण हसून उत्तरली, “अगं आई, करतेय ना! एवढी काय उचलबांगडी करताय? अजून वेळ आहे आपल्याकडं.”

आईने पुन्हा हळूच एक नजर टाकली, तरीही तिच्या आवाजात काळजी स्पष्ट होती, “जेवायलाच जायचंय म्हन ना! अजून उशीर नको. आवर लवकर.” असं म्हणून ती पटकन घरातल्या अन्य गोष्टीत गुंतून गेली.

त्या वेळी रोमितचे वडील आतून, नवीन कपडे घालून, हाताची बटणे लावत बाहेर आले. त्यांच्याही चेहऱ्यावर गडबड होती, पण चेहऱ्याच्या लहानशा हास्यात आश्वासन होतं. त्यांनी पत्नीला आश्वासन देत म्हटलं,

“पोहोचू गं वेळेत! काळजी नको करूस.”

a

तेवढ्यात रोमितचा एक मित्र संदीप आत आला. त्याच्या चेहऱ्यावरही साधेपणा आणि कौतुक दिसत होतं. त्याने घरात पाऊल टाकताच आई म्हणाली, "अरे, तू इथे कसा काय आत्ता?"

मित्र हसत म्हणाला, "काकांनी बोलवून घेतलं गं काकू! तुमाला सोडायचंय ना गांवाला."

वडील त्याच्या खांद्यावर आपुलकीने हात ठेवत म्हणाले, "बघ, म्हटलं ना, वेळेत पोहोचू आपण. हाय ना आपल्या रोमितचा जिवलग मित्र सोबत, कशाला काळजी करायची?" असं म्हणत संदीपचे खांदे जोरात थोपटले त्यांनी, त्याच्या मित्रत्वाची खात्री देत.

इतक्यातच मोबाईलवर एक फोन आला. वडिलांनी फोन घेतला, फोन नंबर ओळखीचा नसल्याने सुरुवातीला त्यांच्या चेहऱ्यावर आधी साधंच प्रश्नचिन्ह होतं, पण फोनवर ऐकलेल्या बातमीने त्यांचे हावभाव बदलले. बदलले कसले, बंदच पडले. त्यांच्या अंगातून सगळं त्राण गेलं, आणि ते मटकन खाली बसले. त्यांच्या डोळ्यांतील नजर शून्यात गेली होती. आई आणि बहीण यांना असे काय झाले म्हणून अचानक घाबरून त्यांच्याकडे धावत आल्या.

आईने काळजीने विचारलं, "अहो, काय झालं?"

रोमितचे वडील काहीच बोलले नाहीत. त्यांची ती गोठलेली अवस्था पाहून संदीप जवळ आला, त्याने फोन आपल्या कानाशी लावला,

कोण?" संदीपने विचारले.

फोनवरील आवाज दुःखाच्या स्वरात काही सांगत होता, ते संदीपने ऐकले, "गावच्या चावडीवरून बोलतोय. आपल्या गावचे भूषण, रोमित चव्हाण हे देशाच्या सेवेत शहीद झालेत अशी बातमी आलीये..."

संदीपने क्लेश अनावर होऊन डोळे मिटून घेतले, दुःखाचा आवंढा गिळला. एक अनपेक्षित क्षणात सगळं काही बदलून गेलं होतं.

---

उपसंहार...

दुसऱ्या दिवशी गांवात शोकाची लहर पसरली होती. रोमितचं पार्थिव गांवात आणलं गेलं. त्याच्या पवित्र भारतीय झेंड्यात बांधलेल्या पार्थिवाच्या पेटीवर फूलांचे हार मांडले होते, आणि त्याच्या बरोबर असलेल्या इतर जवानांनी त्याच्या पार्थिवाला एक अलौकिक मानवंदना दिली होती. कुटुंबीयांसह, सगळा गांव गोळा झाला होता. ते सर्व या मानवी जगाची काहीच नाते व सोयरसुतक नसलेल्या शांततेत आपल्या मार्गाने वाहणाऱ्या नदीच्या काठावरील स्मशानभूमीत रोमितच्या पार्थिवाला अंतिम श्रद्धांजली देण्यासाठी आले होते. वातावरणात एक अनोखी शांतता होती, जी रोमितच्या एकत्रित आठवणींच्या प्रतिध्वनींनी भरली होती.

स्मशानभूमीत रोमितचे छायाचित्र सुशोभित, सुगंधित फुलांच्या हारांनी सजवले गेले होते. तिथे उपस्थित प्रत्येकजण रोमितच्या बलिदानाची कदर करत होता.

त्या शांततेत रोमितच्या मनोगताचे एक शौर्यपूर्ण शब्द घुमू लागले, जे कदाचित तो आपल्या प्रिय कुटुंबियांना सांगू इच्छित होता... मोहिमेवर जाण्यापूर्वी आपल्या कुटुंबाला उद्देशून लिहिलेले ते रोमितचे पत्र वडिलांच्या इच्छेने एक जवान सर्वांसमक्ष वाचून दाखवत होता, ते असे,

a

'आई, माफ कर मी परत येईन म्हणालो होतो, नाही शक्य झालं... ताई, तुही नाराज असशील मला माहित आहे, पण काय करू गं... आपली भारत माता संकटात असताना मी तिथून निघून आलो असतो, तर ते माझ्यासाठीच नाही, तर आपल्या कुटुंबासाठी, गांवासाठी आणि संपूर्ण देशासाठी सुद्धा ती लाजिरवाणी गोष्ट ठरली असती. आणि शिवाय देशाला रक्षणाची गरज असताना मी कसा येणार होतो परत?! मला ठाऊक आहे, बाबा समजून घेतील हे. तुम्ही दोघीही समजून घ्या... कृपया!

'बाबा, तुमची पण माफी मागतो. मुलगा म्हणून मी या जन्मी माझी कर्तव्यं पार पाडू शकणार नाही... पण या देशाचा शूर बच्चा म्हणून मी माझं कर्तव्य पूर्ण केलं आहे याचा सार्थ अभिमान वाटतोय बाबा! आणि मला खात्री आहे तुम्हालाही तो वाटत असेल माझ्याबद्दल!

'एक खंत मात्र सलते... लढणारे आम्ही ना?! पण आम्हाला कोणीच विचारत नाही, की आम्हाला युद्ध हवंय की नकोय. आम्हाला विचाराल, तर आम्हाला नको असते युद्ध! कोणत्याच देशाच्या कोणत्याच शिपायाला युद्ध नकोच असणार. परंतु आपले प्रतिनिधी म्हणून असणारे आपले राज्यकर्ते त्यांच्या केबिनमध्ये बसून निर्णय घेतात आणि आम्हाला तळहातावर आपले प्राण घेऊन युद्धात उतरावे लागते. असो, राजकारण्यांच्या आपमतलबी राजकारणाशी आमचं काही देणंघेणं नाही आम्ही लढत असतो, ते देशाच्या नागरिकाच्या संरक्षणासाठी! जोपर्यंत वाईट प्रवृत्ती आपल्या देशाच्या मुळावर उठलेले आहेत... तोपर्यंत आम्ही लढत राहू. सुरक्षित ठेवू या सीमा. युद्ध नको असले, तरीही आम्ही तिथे असू, उभे राहू लढण्यासाठी सतत! तोपर्यंत जोपर्यंत

हे जग आहे! जगाच्या अंतापर्यंत आम्ही तिथं असू या आपल्या प्राणाहून प्रिय आशा या आपल्या भारत देशाच्या आणि नागरिकांच्या रक्षणासाठी! पुन्हा जन्म मिळाला, तर आई-बाबा, तुमच्या पोटी जन्माला येईन, पण पुन्हा याच देशात जन्म घेईन आणि पुन्हा याच देशाच्या सीमेवर उभा राहीन. माझी बंदूक घेऊन, येणाऱ्या संकटाला, शत्रूला आडवा! किमान तोपर्यंत तरी, जोपर्यंत देशा-देशात सीमा आहेत!!! किंवा किमान तोपर्यंत तरी; जोपर्यंत जगात एकमेकांबद्दल द्वेषभावना आहे...'

परंतु रोमित आता कधीच त्याच्या मता-पित्याला, त्याच्या छोट्या बहिणीला स्वतःहून हे सांगू शकणार नव्हता.

ते पत्र ऐकून आईला अगदीच भडभडून आलं. आईच्या चेहऱ्यावर दुःखाच्या लाटा उठल्या. ती दुःखाने ओक्साबोक्सी रडत म्हणाली, “तू आमच्या जीवनाचा प्रकाश होतास रोमित... का सोडून गेलास रे आम्हाला?”

वडील हात जोडून रोमितच्या फोटोकडे पाहात शांतपणे म्हणाले, “माझ्या मुला, तुझ्या आत्म्याला शांती लाभो. तू देशासाठी दिलेलं बलिदान संपूर्ण देश कधीही विसरणार नाही.”

बहीण फोटोकडे एकटक बघत म्हणाली, “दादा, तुझ्या वाचून जीवनाला अर्थ नाही, पण मी तुला माफ करते. तू कायमच माझा हिरो राहशील.”

त्या विलक्षण शांततेत रोमितला मांवनदना म्हणून हवेत गोळीबार झाला आणि त्यानंतर पार्श्वभूमीत बिगुलचा आवाज घुमू लागला. एका वीराचा सन्मान साजरा होत होता.

काही काळ असाच निमिषात जाऊन, सुर्यरूपी दिवा विरळ होत गेला. संध्या आली आणि प्रकाश कमी झाला. पार्श्वभूमीत राष्ट्रगीताची धून मंद वाजत होती.

अखेर कोणीतरी रोमितच्या सन्मानार्थ उद्गार काढले, “धन्य तो शहिद रोमित चव्हाण! देशाचे रक्षण करत अखेर त्याने मृत्यूला कवटाळले. तो नेहमी आपल्या स्मरणात राहिल, एक कर्तव्यनिष्ठ सैनिक, एक रक्षक, आणि एक योद्धा म्हणून! त्याला लक्ष लक्ष मानवंदना!”

***

a





“सुजाण वाचक हो, रोमितचा जीवन प्रवास जसा सांगायचा होता, त्यामागे एक कारण होतं, ते सांगतो आता···

'असे अनेक जवान आहेत, शहीद आहेत, जे आपले अमूल्य असे मौल्यवान प्राण कचपटाप्रमाणे हातात धरून देशाच्या आणि या देशात राहणाऱ्या प्रत्येक नागरिकांच्या रक्षणासाठी लढत असतात, आपले प्राण गमावत असतात, आणि तेही सर्वांना समान लेखून! आपल्या जवानांनी घेतलेला रक्षणाचा वसा हा भारतातील प्रत्येक नागरिकांसाठी समान असतो. कोणत्याही एका विशिष्ट जाती, धर्म, पंथ, रंग, प्रांत यासाठी नसून अखिल भारत-भू व तिच्या एकत्रित लेकरांसाठी असतो.

'मात्र आपण काय करतो?! याचा विचार कधी आपण केला आहे...?! तर आपण देशांतर्गत जाती-पाती, धर्मावरून आपपसातच भांडत बसतो.

a

कोणत्या तरी एका भ्रष्ट नेत्याच्या मागे लागून, राजकीय पक्षांच्या प्रति निष्ठा ठेवून आपल्याच बांधवांची डोकी फोडायला आपण नेहमी हातात दगड आणि शस्त्र घेऊन तयार असतो. आपला भारत देश आणि आपल्या देशाचे रक्षणकर्ते आपले वीर जवान हे आपलं असलं अभद्र वागणं सहन करणं डिसर्व्ह करत नाहीत.

'आता, एक साधं उदाहरण पाहू, आपण सर्वच स्वतःला मोठे देशभक्त समजतो. देशाला 'भारत माता' म्हणतो, 'माता!' आणि तिच्याच अंगावर थुंकतो? घरात आपल्या आईच्या अंगावर थुंकतो का कधी आपण? मग रस्त्यावर का? कचरा कुठेही टाकतो. साधी इतकी गोष्ट आपण करू शकत नाही, की आपला देश स्वच्छ रहावा आणि आपण देशभक्तीच्या गप्पा मारतो. हा देशाचा अपमान आहे आणि अपमान आहे त्या वीरांचा जे आपल्यासाठी मरणाला अविचारिपणे हसत हसत सामोरे जातात.

'म्हणून आपण स्वतःला थोडी शिस्त लावून घेऊ! जर आपण इतकं नाही करू शकत, तर आपल्याला देशभक्त म्हणवून घेण्याचा अधिकार आहे का? आपल्याच देशातल्या बायकांना आपण स्वातंत्र्य आणि सुरक्षा प्रदान नाही करू शकत, तर काय अर्थ आहे आपल्या देशभक्त असण्याचा?

'आणि देशभक्त असणं म्हणजे इतर देशांना कमी लेखणं नाही हे सुद्धा आपण ध्यानात ठेवलं पाहिजे! आपण आपल्यात माणूस म्हणून थोडे बदल करूयात मग बघा, आपला देश कसा प्रगतीपथावर मार्गक्रमण करतो ते! आणि तेही वायूवेगाने; कधीही न थांबण्यासाठी... उत्तरोत्तर संपन्न होण्यासाठी!!!

कसल्यातरी व्यसनांच्या आहारी जाण्यापेक्षा देशसेवेचा वसा हाती घ्यायला हवा! आपलं जीवन व्यर्थ घालवण्यापेक्षा आपल्या अनेक शहिदांच्या प्रमाणे आपलं जीवन देशाच्या कामी येऊ द्यावं... हे उचित!

'नाही, यासाठी प्रत्येकाने सीमेवरच गेलं पाहिजे असं नाही. फक्त किमान सुजाण व जागरूक नागरिकांची कर्तव्ये काय आहे हे समजून घेऊन त्यावर अंमल करण्याचा प्रयत्न तरी आपण केला पाहिजे इतकंच.

'बस इतकंच सांगण्यासाठी शहीद रोमित चव्हाणच्या जीवन चरित्राचे हे अल्पमती प्रदर्शन होते... आशा आहे, आपण यातून देशसेवेची शिकवण व राष्ट्रकार्याचा बोध घेतला असेल, असे झाले, तर आमची ही कहाणी सुफळ संपूर्ण होईल... धन्यवाद...!!!"

◆◆◆

असो, तर पुढे शहीद 'रोमित तानाजी चव्हाण'ला मरणोत्तर शौर्य पदक प्रदान करण्यात आले, ते त्याच्या आईंनी दिल्लीला जाऊन स्वीकारले.

महत्त्वपूर्ण सूचना :-

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

© All kind of copyright solely remains to the writer Suraj Kashinath Gatade.

a

# सूरज काशिनाथ गाताडे यांची यापूर्वीची प्रकाशित पुस्तके



















सूरज गाताडे
डेथ विल


सूरज गाताडे


सूरज गाताडे
दे
किस
बाय मिस्टेक


सूरज गाताडे


सूरज गाताडे


सूरज गाताडे
अंतःपुर


सूरज गाताडे


सूरज गाताडे
X


सूरज गाताडे
'अ प्योर् वन-दि एप्रिल चेज़!'